# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका केन्द्र शासनाचे निर्देशानुसार अमृत २.० योजना राबविणार आहे. शासनाच्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिकेने अमृत २.० योजनेअंतर्गत नागपूर शहरातील अनधिकृत/ अधिकृत/स्लम भागात पाणीपूरवठा प्रणालीचे उन्नतीकरण, बळकटीकरण करण्याकरीता फीडर मेन सह सम्पचे बांधकाम व बुस्टर पंप बसविण्याकरीता प्रकल्प अहवाल शासनाकडे अमृत २.० योजनेअंतर्गत मंजूरीस्तव व निधी वितरीत करण्याकरीता सादर करण्यात आला आहे. अमृत २.० योजनेअंतर्गत केन्द्र शासन २५%, राज्य शासन २५% व म.न.पा.चा ५०% हिस्सा आहे. केन्द्र शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची संमती/हमी अंतर्गत खालील विषयास मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे

**{सा.आ.अभि. विभाग}**

अ. सदर प्रकल्पास शिखर समितीने मंजुरी दिलेल्या किंमती व्यतिरिक्त प्रकल्पाची भाववाढ व अतिरिक्त खर्चास (देखभाल व दुरूस्ती खर्चासह) संमती प्रदान करणे.

ब. शासनाच्या निर्देशानुसार अमृत २.० अंतर्गत उपरोक्त प्रकल्पांकरीता शासनाने मंजूरी दिलेल्या प्रकल्प राशीवर नागपूर महानगरपालिकेस स्वहिस्स्याचा निधी म.न.पा. निधीतून खर्च करण्यास संमती प्रदान करणे.

टिप :- सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 204/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 19/12/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प), सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका केन्द्र शासनाचे निर्देशानुसार अमृत २.योजना राबविणार आहे. शासनाच्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिकेने अमृत २.० योजनेअंतर्गत नागपूर शहरातील अनधिकृत/ अधिकृत/स्लम भागात पाणीपूरवठा प्रणालीचे उन्नतीकरण, बळकटीकरण करण्याकरीता फीडर मेन सह सम्पचे बांधकाम व बुस्टर पंप बसविण्याकरीता प्रकल्प अहवाल शासनाकडे अमृत २.० योजनेअंतर्गत मंजूरीस्तव व निधी वितरीत करण्याकरीता सादर करण्यात आला आहे. अमृत २.० योजनेअंतर्गत केन्द्र शासन २५%, राज्य शासन २५% व म.न.पा.चा ५०% हिस्सा आहे. केन्द्र शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची संमती/हमी अंतर्गत खालील विषयास मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे

आ. सदर प्रकल्पास शिखर समितीने मंजुरी दिलेल्या किंमती व्यतिरिक्त प्रकल्पाची भाववाढ व अतिरिक्त खर्चास (देखभाल व दुरूस्ती खर्चासह) संमती प्रदान करणे.

ब. शासनाच्या निर्देशानुसार अमृत २.० अंतर्गत उपरोक्त प्रकल्पांकरीता शासनाने मंजूरी दिलेल्या प्रकल्प राशीवर नागपूर महानगरपालिकेस स्वहिस्स्याचा निधी म.न.पा. निधीतून खर्च करण्यास संमती प्रदान करणे.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**